(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar


**Peer-Reviewed & Refreed Indexed**

**Multidisciplinary International Research Journal**

## January-2021

**SPECIAL ISSUE- CCLXX (270)**





**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor :**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe ArtsComm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

## The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

| | | |
|---|---|---|
| 20 | आंबेडकरी विचारकाव्य एक विहंगमावलोकन प्रा.डॉ.स्मिता शेंडे | 88 |
| 21 | फळबाग लागवड तंत्र प्रा. डॉ.संतोष एन.ताडे | 96 |
| 22 | जगाच्या इतिहासात धम्मपद हा ग्रंथ अमूल्य ज्ञानाचा सागर आहे. डॉ. अजय खडसे | 98 |
| 23 | जागतिकीकरणोत्तर दलित कविता डॉ. सुनील अभिमान अवचार | 101 |
| 24 | भारतातील महिला विकास संबंधी योजनांचे अध्ययन प्रा. डॉ. सुनिता श्रीकृष्ण बाळापुरे | 108 |
| 25 | कोविड २०१९ चा भारतीय कृषी अर्थव्यवस्थेवरील परीणाम दिपक एन. काळे | 112 |
| 26 | भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये रुपयाचे अवमुल्यन होण्याची कारणे डॉ. केशव सुर्यभानसा गुल्हाने | 116 |
| 27 | लोकशाहीतील स्त्रियांचा दर्जा कल्पना बंडीवार | 119 |
| 28 | १९९० नंतरचे समाजवास्तव व मराठी कवितेचे स्वरूप प्रा. मनीषा नामदेव बनसोडे | 122 |
| 29 | लोककल्याणकारी राज्य की निर्मिती में राजनिती के निर्देशक सिद्धांतों का महत्व डॉ.विभा प्र.देशपांडे | 125 |
| 30 | पारंपारिक स्त्री से आधुनिक स्त्री तक: एक प्रवास डॉ. फरहिना शिरीन नसिरोद्दीन | 128 |
| 31 | दिव्यांग व्यक्तियों का वर्तमान परिदृश्य विवेक संतोषराव गोर्लावार | 134 |
| 32 | हिंदी के आँचलिक उपन्यास और उनका महत्व लेफ्टनंट डॉ. रविंद्र पाटील | 142 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) –7.675, Issue NO, 270 (CCLXX)
ISSN : 2278-9308
January, 2021

# भारतातील महिला विकास संबंधी योजनांचे अध्ययन

प्रा. डॉ. सुनिता श्रीकृष्ण बाळापुरे
गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख स्व. दत्तात्रय पुसदकर,कला महाविद्यालय, नांदगावपेठ,ता.जि.अमरावती.

**प्रस्तावना :-**

महिला विकास हा अतिशय महत्वाचा व जिव्हाळयाचा विषय आहे. महिला विकासाला प्राधान्य देण्याची गरज भासण्याचे प्रमुख कारण, आता पर्यत सर्वच समाजात स्त्रीयांना दुय्यम स्थान देण्यात आले होते, त्यामुळे त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या मार्गात अनेक अडथळे उभे राहीले. वास्तविकपणे मनुष्य या नात्याने पुरुषांइतक्याच स्त्रियाही महत्वाचा घटक ठरतात, ते परस्परपुरक असे घटक आहेत. यापैकी कुणाही एकाचे जीवन दुसऱ्याच्या मदतीशिवाय व सहकार्याशिवाय अपूरे ठरते. व्यवहारातही नेहमी त्यांना रथाची दोन चाके म्हणतात म्हणजे संसार सुरळीत, व्यवस्थित चालू राहण्यास दोन्ही चाकांची तितकीच गरज असते असे मानले जाते, परंतु प्रत्यक्षात मात्र पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांना दुय्यम स्थान मिळत आले आहे, त्यामुळे त्यांना विकासाच्या पुरेशा संधी मिळू शकल्या नाहीत. अशा परिस्थितीमुळे स्त्रिया सर्वच दृष्टीकोणातून मागासल्या राहणे साहजिकच आहे, मात्र समाजाचा सर्वांगिण विकास करावयाचा असेल तर समाजातील महत्वाचा घटक स्त्री याकडेही लक्ष देणे, त्यांच्या विकासाकरीता योजना आखून त्याविषयी सर्व स्त्रियांमध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे.

**उद्दिष्टे :-**

१) महिला विकास व मानवीहक्क संबंध अभ्यासणे.
२) महिलांच्या हक्कासंबंधी राज्यघटनेतील तरतूदींचे अध्ययन करणे.
३) महिला आरोग्याशी संबंधीत योजनांचे अध्ययन करणे.
४) महिला सक्षमीकरणाशी संबंधीत योजनांचे अध्ययन करणे.

**महिला विकास व मानवी हक्क :-**

महिला विकास व मानवी हक्क यांचा निकटचा संबंध आहे. कारण महिला मागास राहण्याचे सर्वात महत्वाचे कारण त्यांना आतापर्यत अनेक मानवी हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले हे होय. स्त्री ही मानव समाजाचा महत्वाचा घटक असूनही तिला पुरूषांच्या बरोबरीने हक्क मिळत नव्हते, त्यामुळे तिला आपला सर्वांगीण विकास करून घेणे शक्य नव्हते, अशावेळी महिला विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्याकरीता स्त्रियांना त्यांचे मुलभूत मानवीहक्क मिळकती अशी व्यवस्था करणे गरजेचे आहे. पुरूषप्रधान समाज व्यवस्था, धार्मिक कल्पना, सामाजिक रूढी, परंपरा यांनी ग्रासलेल्या समाजात स्त्रियांच्या हक्कांचे रक्षण करण्याच्या बाबींकडे गांभियाने बघीतले गेले नाही, मात्र जोपर्यत महिलांना त्यांचे हक्क, कर्तव्य व अधिकारांची जाणीव होणार नाही तोपर्यत महिलांचा विकास साधने शक्य नव्हते, म्हणून मानवी हक्का अंतर्गत महिल हक्कांविषयी जनजागृती करून महिला विकास साधल्यास समाज पुरोगामी वाटचालीकडे मार्गक्रमण करू शकतो.

**महिला हक्कां संबंधी राज्यघटनेतील तरतूदी :-**

भारतीय राज्यघटनेत महिला हक्क आणि त्यांच्या हितरक्षणासंबंधी अनेक महत्वाच्या तरतुदी करण्यात आल्यात. राज्यघटनेच्या जाहीरनाम्यातच सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाची हमी देण्यात आली आहे. स्वातंत्र्याच्या आंदोलनातही स्त्री-पुरूष समानतेच्या मुल्यांना विशेष महत्व दिले होते, त्यामुळे आपल्या घटनाकारांनी

सुध्दा या मुल्यांचा योग्य आदर ठेवून महिलांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी राज्यघटनेत अनेक तरतूदी करून ठेवल्या आहेत.

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा समावेश करण्यात आला. मूलभूत हक्कांची तरतूद करतांना स्त्री-पुरूष समानतेचे तत्वप्रमाण मानले आहे.

१) **समानतेचा हक्क** :- भारतीय राज्यघटनेतील हा एक महत्वाचा हक्क होय. या हक्काअंतर्गत प्रत्येक व्यक्ती कायद्यापुढे समान असेल व प्रत्येकाला कायद्याचे समान संरक्षण प्राप्त होईल.

२) राज्य नागरीकांमध्ये धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यापैकी कोणत्याही आधारावर भेदभाव करणार नाही.

३) भारतीय राज्यघटनेत नागरीकांना समान संधीची तरतूद आहे. कोणत्याही नागरीकाला धर्म, वंश, जात, लिंग, कुळ, जन्मस्थान, वास्तव्याचे ठिकाण यापैकी कोणत्याही एका कारणावरून राज्याच्या अधिपत्याखालील पद मिळविण्यास अपात्र ठरविले जाणार नाही.

**मूलभूत कर्तव्ये** :-

राज्यघटनेत नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला, यातही महिलांना समानतेची वागणुक व त्यांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासंबंधी उल्लेख आहे. मूलभूत कर्तव्यांपैकी एक कर्तव्य असे सांगितले आहे की, धार्मिक, भाषिक, प्रादेशिक किंवा वर्गीय भेदभावांच्या पलीकडे जाऊन सर्व भारतीय जनतेत ऐक्य व बंधूभावाची भावना वाढीव लागावी, तसेच स्त्रीयांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करावा.

३) **राज्याच्या धोरणांची मार्गदर्शक तत्वे** :-

भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात राज्याच्या धोरणांच्या मार्गदर्शक तत्वांचा समावेश आहे. या मार्गदर्शक तत्वांचा समावेश आहे. या मार्गदर्शक तत्वां मध्ये स्त्री-पुरुष समानता आणि स्त्रीयांच्या हक्काचे रक्षण यावर भर दिला असल्याचे दिसून येते, ती पुढीलप्रमाणे.

- लोक कल्याणासाठी न्याय असेल अशी समाजव्यवस्था निर्माण करून ती टिकविण्यासाचा प्रयत्न केला जाईल.
- स्त्री पूरूषांसह सर्व नागरीकांना उपजिवीकेचे पुरेशे साधन होण्याच्या दृष्टीने राज्या कडून प्रयत्न केला पाहिजे.
- स्त्री-पुरूषांना समान कामासाठी समान वेतन मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल.
- स्त्री-पुरूष कामगारांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होणार नाही किंवा दूरूयोग केला जाणार नाही याची काळजी घेतजी जाईल.
- कामाच्या ठिकाणी न्याय, माणुसकीची परिस्थिती निर्माण करण्याची आणि प्रसृती सहाय्य मिळवून देण्याची व्यवस्था करण्यात येईल.
- चौदा वर्षाखालील सर्व मुलामुर्लींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची व्यवस्था राज्य करेल.

**महिलांच्या आरोग्याशी निगडीत योजना** :-

महिलांना विकास घडवून आणतांना त्यांचे आरोग्यसुदृढ असावे याकरीता शासनामार्फत काही योजना सूरू करण्यात आल्यात, त्या पुढीलप्रमाणे.

१) **जननी सुरक्षा योजना** :- सन २००५-२००६ पासून राज्यात जननी सुरक्षायोजना राबविली जात आहे. रूग्णालय, आरोग्य केंद्र व अन्य आरोग्य संस्थामध्ये होणाऱ्या प्रसृतीचे प्रमाण वाढवून महिलांच्या व अर्भकांच्या मृत्यूचे प्रमाण कमी करणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत आरोग्य संस्थेत प्रसृत झालेल्या महिलांना शहरी भागात रू.६००/- तर ग्रामीण भागात रू.७००/- दिले जातात. तसेच कुशल दायीच्या मदतीने घरी प्रसृत

ISSN : 2278-9308
January, 2021

होणाऱ्या महिलांना दोन अपत्यांपर्यंत रू.५००/- तर सिझेरीयन प्रसूती झालेल्या महिलेस रू.१५००/- दिले जातात. सन २००१-२००३ मध्ये राज्यातील माता मृत्यूदर हजारी १०४९ होता, तो सन २०११-१२ मध्ये ०.६८ पर्यंत कमी करण्यात यश आले आहे.

२) **इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना** :- गर्भवती स्त्रीया व स्तनदामाता यांचे आयोग्य उत्तम राहून पोषणाचा दर्जा सुधारावा या उद्देशाने सन २०११ पासून देशातील ५२ जिल्हयांपैकी महाराष्ट्रातील भंडारा व अमरावती या दोन जिल्हयात प्रायोगिक तत्वावर ही योजना राबविली जाते. या अंतर्गत लाभधारक गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांना तीन हप्त्यांमध्ये रू.४,०००/- रोख दिले जाते, यानुसार २०१५-१६ मध्ये ०.६२ लाख तर सन २०१६-१७ मध्ये ०.५९ लाख लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

३) **जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम** :-

दिनांक १ जून २०११ पासून सुरू झालेल्या या कार्यक्रमाअंतर्गत सार्वजनिक आरोग्य संस्थेत प्रसृत होणाऱ्या सर्व गर्भवती महिलांना सिझेरियन प्रसृतीसह सर्व सोयीसुविधा मोफत पुरविल्या जातात. जसे मोफत औषधी व तपासन्या, प्रसृतीनंतर मोफत आहार, रोगनिदान, आवश्यकतेनुसार रक्त पुरविणे, येण्याजाण्याचा प्रवास खर्च याशिवाय आजारी नवजात बालकांना ३० दिवसां पर्यंत मोफत औषधोपचार पुरविणे इ. सुविधा दिली जाते.

४) **नवसंजीवनी योजना** :-

प्रसृतीच्या संस्थात्मक सोयी, सुविधांचा अभाव, अनारोग्य, अज्ञान व दारिद्रय यामुळे प्रसृती दरम्यान होणाऱ्या मातामृत्यूचे तसेच कुपोषण आणि आरोग्य सुविधांचा अभाव यातून उद्भवणाऱ्या बालमृत्यूचे प्रमाण आदिवासी भागात अधिक आहे. अशाच राज्यातील १५ जिल्हयांमधील आदिवासी भागातील ८,४१९ गावांमध्ये नवसंजीवनी योजना राबविली जात आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक गाव व पाडयावरील आजारी व कुपोषीत बालकांना शोधून त्यांच्या घरी जाऊन औषधोपचार करण्यावर भर दिला जात आहे. आवश्यकतेनुसार संबंधीत बालकाला वाहनाव्दारे मदत केंद्रावर पोहोचविले जाते.

आदिवासी भागातील गर्भवती महिलांची नियमित आरोग्य तपासणी व्हावी व त्यांना आवश्यक औषधी पुरविली जातीत या दृष्टीकोनातून आदिवासी भागात नवसंजीवनी योजनेअंतर्गत मातृत्व अनुदान योजना राबिवीली जाते.

५) **आशा (Asha)** :-

आशा म्हणजे अधिकृत सामाजिक आरोग्य कार्यकर्त्या (Accredited Social Health Activities) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना अंतर्गत ग्रामस्तरावर आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी आशाचा उपयोग होतो. ग्रामीण जनता व आरोग्य केंद्र यांच्या मध्ये आशा मध्यस्थांचे काम करतात. गैरआदिवासी भागात १५०० लोकसंख्येमागे एक आशा, तर आदिवासी भागा मध्ये १००० लोकसंख्येमागे एक आशा नियुक्त करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील लोकांना स्वच्छता, लसीकरण यांचे महत्व पटवून देण्यासाठी त्याचप्रमाणे ताप, हगवण, जखमा यावर प्राथमिक उपचार करण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्यात येते. त्यांना या कामगिरीबद्दल प्रोत्साहनपर वेतन / भत्ते देण्याची तरतुद आहे. या माध्यमातून महिलांना रोजगारही उपलब्ध करून देण्यात आला. ग्रामीण महिलांची प्रसृती, स्तनपान, लसीकरण, गर्भ निरोधक, जननेंद्रीयांशी संबंधीत जंतूसंसर्ग, लैगिक संबंधातून होणारे जंतू संसर्ग, नवजात अर्भकाची काळजी इत्यादी आरोग्य विषयक बाबींसंबंधी मदत व मार्गदर्शन करण्यास आशा सदैव तत्पर असतात.

**महिला सक्षमीकरण योजना व कार्यक्रम :-**

महिला सक्षमीकरणाचे महत्व लक्षात घेवून भारत तसेच राज्य सरकारने महिलांविषयी धोरणांना अग्रक्रम देवून विविध उपक्रम हाती घेतले. निरनिराळया योजना आखून त्या राबविल्या. महिला विकासाच्या दृष्टीने विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी केली. समाजाच्या व्यापक हिताच्यादृष्टीने महिला विकासाला प्राधान्य देवून काही योजना राबविल्या, त्यापुढील प्रमाणे :-

१) **राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण (सबला)** :- पुर्वीच्या किशोरी शक्ती व किशोरींसाठी आहार कार्यक्रमाचे एकत्रीकरण करून दिनांक १९ नोव्हेंबर २०१० पासून ही योजना अधिक व्यापक स्वरूपात देश व राज्यात राबविली जात आहे, हिच योजना सबला या नावाने ओळखाली जाते, या अंतर्गत ११ ते १८ वयोगटातील मुलींना शैक्षणिकदृष्टया, आरोग्यदृष्टया व आर्थिकदृष्टया सक्षम बनविण्याचे उद्दीष्ट आहे. जिल्हयातील एकात्मिक बाल विकास सेवा केंद्रा मार्फत ही योजना राबविली जाते, यामध्ये ११ ते १४ वर्षे वयाच्या शालाबाहय मुली तर १४ ते १८ वर्षाच्या सर्वच मुलींना घरी धान्य दिले जाते. फोलीक ॲसिडयुक्त गोळया व जिवनसत्व-अ चे डोज दिले जातात. आरोग्य तपासणी, आहार व आरोग्य शिक्षण, कुटुंबकल्याण विषयक मार्गदर्शन व समुपदेशन, लैगिकबद्दल व बालसंगोपन विषयक ज्ञान देणे आदि सेवा पुरविल्या जातात.

२) **महिलांना प्रशिक्षण व रोजगार सहाय्यता कार्यक्रम** :- भारत सरकारने हा कार्यक्रम केंद्रीय क्षेत्र योजनेच्या स्वरूपात १९८७ मध्ये सुरू केला. याअंतर्गत महिलांच्या पारंपारीक क्षेत्रातील कौशल्य विकसित करून त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यावर भर दिला. महिलांचे गट तयार करून त्यांना आवश्यक ती मदत उपलब्ध करून दिली जाते. यात कृषी, पशूपालन, दुग्ध व्यवसाय, हातमाग, हस्तकला, खादी व ग्रामोद्योग, रेशीमकीडे या क्षेत्रांचा समावेश केला.

३) **स्वयंसिध्दा** :- ही महिला विकासाची व सक्षमीकरणाची एकात्मीक योजना आहे. महिलांना सामाजिक व आर्थिकदृष्टया समक्षम बनविणे हे या योजनेचे दिर्घकालीन उद्दिष्ट आहे. या योजनेअंतर्गत मलिांचे स्वयंसहाय्यता गट बनवून त्याव्दारे महिलांचा दर्जा, आरोग्य, आहार, शिक्षण, स्वच्छता, हक्क इत्यादी संबंधी जागृती व विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.

४) **स्व:शक्ती** :- ग्रामीण महिलांचा विकास व सक्षमीकरण करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे या उद्देशाने निरनिराळे उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये जिवनस्तर उंचावणे आणि आर्थिक स्वायत्ता यावर भर देवून शारीरिक कष्टाच्या कामापासून महिलांना मुक्त करणे हे या योजनेचे उद्दिष्टे आहे.

५) **बालीका समृध्दी योजना** :- ही योजना दिनांक २ ऑक्टोंबर १९९७ ला सुरू करण्यात आली. समाजात मुलींचा दर्जा उंचावणे आणि मुलींबाबत समाज व कुटुंबात विधायक परिवर्तन घडवून आणणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्टे आहे. याअंतर्गत दारीद्रयरेषेखालील कुटुंबातील १९९७ नंतर जन्माला आलेल्या दोन मुलींसाठी ही योजना लागू होते. यामध्ये मुलींच्या नावे विशिष्ट रक्कम बँकेत किंवा पोस्टात ठेवली जाते.

६) **तात्पुरती निवारा गृहे** :- कौटुंबिक ताणतणाव, सामाजिक बहिष्कार, नैतीक धोका इ. कारणांनी सामाजिक, आर्थिक व भावनिक समस्यांनी घेरलेल्या मुली व स्त्रीयांचे पुनर्वसन करण्याच्या उद्देशाने सन १९६९ मध्ये ही सुरू करण्यात आली. याअंतर्गत गरजू मुली व स्त्रीयांना सहा महिन्यां पासून तीन वर्षापर्यत आसरा देण्यात येतो.

७) **कुटुंब सल्ला केंद्र** :- केंद्रीय समाज कल्याण बोर्ड काही स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने सन १९९४ पासून ही केंद्रे चालवितात. त्यांना या कामाचे बोर्डाकडून अनुदान दिले जाते. ज्या स्त्रीया, मुली कौटुंबिक हिंसाचाराच्या बळी ठरल्या आहेत अशांना सहाय्य करणे व पुर्नवसन करण्यास हातभार लावणे हे कुटुंब सल्ला / सेवाकेंद्राचे मुख्य उद्दीष्ट होय.

८) **स्त्रियांसाठी वसतीगृहे** :- नोकरी किंवा इतर काम करणाऱ्या महिलांना निवासाची सोय व्हावी म्हणून वस्तीगृहे सुरू करण्यास केंद्राकडून अनुदान दिले जाते. यामध्ये महिला कल्याण व शिक्षणासाठी कार्य करणाऱ्या अशासकीय संस्था, विद्यापीठ, स्थानिक स्वराज्य संस्थांना महिला वस्तीगृहाच्या इमारती बांधण्यासाठी केंद्र सरकार मदत देते. यात नोकरी, काम करणाऱ्या महिला, प्रशिक्षण घेणाऱ्या महिला व मुलींची निवासाची सोय करून दिली जाते.

९) **महिलांसाठी अल्प मुदतीचे अभ्यासक्रम** :-

ही योजना केंद्रीयसमाजकल्याण मंडळामार्फत राबविली जाते. या योजनेचा उद्देश स्त्रियांना शिक्षण आणि आवश्यक ती कौशल्ये आत्मसात करण्याचे ज्ञान देवून त्याव्दारे त्यांचे सामाजिक व आर्थिक सक्षमीकरण करण्याचे ज्ञान देवून त्याव्दारे त्यांचे सामाजिक व आर्थिक सक्षमीकरण घडवून आणणे हा आहे. १५ वर्षावरील स्त्रीयांना या योजनेचा लाभ मिळवून दिला जातो.

अशाप्रकारे महिला विकास या महत्वाच्या विषयाला अग्रक्रम देवून महिला सक्षमीकरण, सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीने भारतसरकारने राज्यघटनेत त्यासंबंधी समानतेच्या तरतूदी केलेल्या आहेत. महिलांचे हक्क हे मानवीहक्क म्हणून त्यांना मुलभूतहक्क व कर्तव्याची व्यवस्था केली आहे. त्यामुळेच आज समाजात पुढारलेल्या क्षेत्रामध्ये पुरूषांच्या बरोबरीने महिलासुध्दा कर्तव्य बजावत आहेत. महिलांच्या आरोग्याशी निगडीत अनेक भरीव योजना सूरू करण्यात आल्यात. ज्यामुळे महिलांना सकसपोषण व आरोग्यविषयक सर्व सोईसुविधांचा उपयोग घेता येतो. मातामृत्यूदर व बालमृत्यूदर कमी करण्यामध्ये या योजनांचा भरीव वाटा आहे. महिलांना आर्थिक सक्षमीकरणा संबंधीही भारतसरकारच्या अनेक योजना असून त्यासर्व योजनांची यशस्वीता म्हणजे आज ग्रामीण असो की शहरी सर्व महिलांमध्ये वैचारीक सामर्थ्य निर्माण होवून आत्मविश्वास निर्माण झाला. यामुळेच आज लोकसंख्येतील जवळपास ४९% वाटा असलेल्या महिला समाजिक, शैक्षणिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रातही आपला ठसा उमटवतांना दिसून येत आहेत.

**संदर्भ ग्रंथ**

- E Book of Ministry of Women and Child Development.
- राष्ट्रीय महिला आयोग : Ministry of Women and Child Development.
- womenchild.maharashtra.gov.in
- wcd.nic.in